**राज्यातील आर्थिकदृष्टया आजारी/अवसायनात असलेले सहकारी साखर कारखाने भागीदारी/सहयोगी/ भाडेतत्वावर चालविण्यास घेतलेल्या एजन्सी/कंपनी किंवा चालविण्यास घेतलेल्या साखर कारखान्याकडून ऊस पुरवठादारांची FRP ची थकीत रक्कम झाल्यास करावयाच्या कार्यवाहीबाबत.**

## महाराष्ट्र शासन

**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग**

**शासन निर्णय क्रमांक : ससाका-१२२५/प्र.क्र. १९२/३-स**

दालन क्र. ६२०, सहावा मजला, विस्तार इमारत,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : १३ फेब्रुवारी, २०२६.

वाचा:-

१) शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग क्र. ससाका-२०१९/प्र.क्र.१०५/३-स, दि.०४.०९.२०२०.
२) शासन शुध्दिपत्रक, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग क्र. ससाका-२०१९/प्र.क्र.१०५/३-स, दि.०८.०९.२०२०

**प्रस्तावना:**

राज्यातील आर्थिकदृष्टया आजारी/अवसायनात असलेले/सिक्युटराझेशन ॲक्टमधील तरतूदीप्रमाणे सहकारी साखर कारखाने भागीदारी/सहयोगी/भाडेतत्वावर चालविण्यास देण्यात आलेले आहेत. त्याकरीता शासन शुध्दिपत्रक दि. ०८.०९.२०२० अन्वये राज्यातील आर्थिकदृष्टया आजारी/अवसायनात असलेले सहकारी साखर भागीदारी/सहयोगी/ भाडेतत्वावर चालविण्यास देण्याबाबत निकष निश्चित करण्यात आले आहेत. परंतु त्यामध्ये भागीदारी/सहयोगी भाडेतत्वावर चालविण्यासाठी घेतलेल्या एजन्सी, कंपनीकडून किंवा चालविण्यासाठी घेतलेल्या साखर कारखान्यांकडून गाळप हंगामाकरीता निर्धारीत केलेल्या दरानुसार ऊस पुरवठादारांना FRP ची रक्कम विहीत मुदतीमध्ये अदा केलेली नसल्यास करावयाच्या कार्यवाहीचा समावेश उपरोक्त शासन निर्णयामध्ये करण्यात आलेला नव्हता. तसेच विहित मुदतीत FRP अदा केली जावी याबाबत मा.मुख्य सचिव महोदयांच्या अध्यक्षतेखालील उस नियंत्रण मंडळाने घेतलेल्या निर्णयास अनुसरुन सहकारी साखर कारखाने भागीदारी/सहयोगी/भाडेतत्वावर चालविण्यास घेतलेल्या एजन्सीच्या/ कंपनीच्या किंवा चालविण्यास घेतलेल्या साखर कारखान्याकडून ऊस पुरवठादारांची FRP ची रक्कम थकीत झाल्यास करावयाची कार्यवाही ठरविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:**

राज्यातील आर्थिकदृष्टया आजारी/अवसायनात असलेले/सिक्युटराझेशन ॲक्टमधील तरतूदीप्रमाणे सहकारी साखर कारखाने भागीदारी/सहयोगी/ भाडेतत्वावर चालविण्यास घेतलेल्या/ एजन्सीच्या/ कंपनीच्या किंवा चालविण्यास घेतलेल्या साखर कारखान्याकडून ऊस पुरवठादारांची FRP ची रक्कम थकीत झाल्यास पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्याचा निर्णय घेण्यात येत आहे :-

१) सहकारी साखर कारखाने भागीदारी/सहयोग/भाडेतत्वावर घेणेबाबत करार करताना तसेच, गाळप हंगामाकरीता गाळप परवाना अर्ज सादर करताना अशा एजन्सीकडून/कंपनीकडून किवा अन्य साखर कारखान्यांकडून किमान रुपये १० कोटी रकमेची बँक गॅरंटी साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे नावाने घेण्यात येईल.

२) गाळप हंगामामध्ये विहीत मुदतीमध्ये FRP ची संपूर्ण रक्कम अदा झाल्याबाबत त्या गाळप हंगामाचा हंगाम समाप्तीनंतर FRP निरंक दाखला सादर केल्यानंतर सदरची बँक गॅरंटी संबंधितांना परत करण्यात येईल.

३) संबंधितांकडून विहीत मुदतीमध्ये FRP ची रक्कम अदा न झाल्यास वसूली प्रमाणपत्र निर्गमीत केलेले असल्यास, बँक गॅरंटीतून ऊस पुरवठादारांच्या अनुज्ञेय FRP च्या रकमा विलंब कालावधीच्या व्याजासह अदा करण्यात येतील. अशा रकमा अदा केल्यानंतर बँक गॅरंटीमधील रक्कम शिल्लक राहिल्यास, गाळप हंगामच्या समाप्तीनंतर FRP निरंक दाखला सादर केल्यानंतर सदरची बँक गॅरंटी संबंधितांना परत करण्यात येईल.

४) भागीदारी/ सहयोगी/ भाडेतत्वावर चालविण्यास घेतलेल्या सहकारी साखर कारखान्यांच्या बाबतीत जप्तीची कारवाई मुळ सहकारी साखर कारखान्यांच्या स्थावर व जंगम मालमत्तेवर करता येणार नाही. त्यामुळे FRP अदा करण्यात कसूर झाल्यास भागीदारी/सहयोगी/ भाडेतत्वावर सहकारी साखर कारखाना चालविण्यास घेतलेल्या/एजन्सीच्या/कंपनीच्या किंवा सहकारी साखर कारखाना चालविण्यास घेतलेल्या साखर कारखान्याच्या स्थावर, जंगम मालमत्ता व संबधीत कारखान्यांने उत्पादित केलेली साखर, मोलॅसिस, बगॅस आणि इतर उत्पादनांवर जप्तीची कारवाई करण्यात येईल.

५) अशा कारवाईच्या अनुषंगाने संबंधितांविरूध्द वसूली प्रमाणपत्र निर्गमित करण्यात आले असल्यास, ऊस पुरवठादारांना थकीत FRP ची रक्कम अदा करण्याकरीता प्रथमत: त्यांनी सादर केलेल्या रू.१०.०० कोटीच्या बँक गॅरंटीमधून संबंधितांना रकमा अदा करण्यात येतील. याकरीता संबंधितांनी गाळप परवान्याकरीता अर्ज सादर करताना त्यांच्या स्वत:च्या स्थावर व जंगम मालमत्तेचा अदयावत तपशील सादर करणे अनिवार्य असेल.

६) बँक गॅरंटीच्या रकमेमधून संपूर्ण थकीत FRP विलंब कालावधीच्या व्याजासह अदा करणे शक्य न झाल्यास वसूली प्रमाणपत्राच्या अंमलबजवाणीकरीता प्राधिकृत करण्यात आलेल्या

जिल्हाधिकाऱ्यांना संबंधित सहकारी साखर कारखाना चालविणाऱ्या एजन्सी/कंपनीच्या किंवा अन्य साखर कारखान्यांच्या स्थावर व जंगम मालमत्तेमधून उर्वरीत देय थकीत FRP विलंब कालावधीचे व्याजासह अदा करण्याकरीता वैधानिक कारवाई संबंधीत जिल्हाधिकारी यांनी करावी.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०२१३१५३०३३०००२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

ANKUSH PANDURANG SHINGADE

Digitally signed by ANKUSH PANDURANG SHINGADE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=CMTD,
2.5.4.20=0619305C0A0825664EFA457FFA51C3F2364841C81F8C43707
8A333B7111446A2, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=E11F71FCAC231B0F91F430636DE14F6C49B569D17334
6155B9208DCD97DD078B, cn=ANKUSH PANDURANG SHINGADE
Date: 2026.02.13 15:31:24 +05'30'

**( अंकुश शिंगाडे )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रति,**

१) मा.मुख्य सचिव तथा अध्यक्ष, ऊस नियंत्रण मंडळ, मंत्रालय, मुंबई.
२) अपर मुख्य सचिव (वित्त), सदस्य, ऊस नियंत्रण मंडळ, मंत्रालय, मुंबई.
३) प्रधान सचिव (सहकार), सदस्य, ऊस नियंत्रण मंडळ, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.
४) अपर मुख्य सचिव (कृषि), सदस्य, ऊस नियंत्रण मंडळ, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
५) साखर आयुक्त महाराष्ट्र राज्य, पुणे तथा पदसिध्द सदस्य सचिव, ऊस नियंत्रण मंडळ.
६) संचालक (प्रशासन), साखर आयुक्तालय, साखर संकुल, पुणे.
७) सर्व प्रादेशिक सहसंचालक (साखर)
८) नामनिर्देशित प्रतिनिधी, संबंधित साखर कारखाने
९) नामनिर्देशित शेतकरी प्रतिनिधी, संबंधित साखर कारखाने
१०) निवड नस्ती (३-स).